RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ८, अंक २१] सोमवार, फेब्रुवारी २१, २०२२/फाल्गुन २, शके १९४३ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ६२**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

मंत्रालय (विस्तार), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १७ फेब्रुवारी, २०२२

**अधिसूचना**

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम,१९६०.**

क्रमांक सीएसएल. २०१६/ प्र.क्र.३५/ १३स.— महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (१९६१ चा महा.२४) याच्या कलम १६५ च्या पोट-कलम (१) व (२) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन,याद्वारे, **महाराष्ट्र शासन राजपत्र**, असाधारण, भाग चार ब, दिनांक १६ डिसेंबर २०२१ मध्ये प्रसिद्ध केलेल्या शासकीय अधिसूचना, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्रमांक सीएसएल-२०१६/प्र.क्र.३५/१३स, दिनांक १६ डिसेंबर,२०२१ अनुसार मागविलेले आक्षेप व सुचना विचारात घेतल्यानंतर, महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम, २०१४ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी, पुढील नियम करीत आहे :—

१. या नियमांस, महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) (तिसरी सुधारणा) नियम, २०२१ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम, २०१४ याच्या नियम ७४ ऐवजी पुढील नियम दाखल करण्यात येईल :—

"७४. नैमित्तिक रिक्त पदे :- (१) संस्थेच्या निवडून आलेल्या समिती सदस्याचा मृत्यू, राजीनामा, अनर्हता, किंवा पदावरून काढून टाकणे यामुळे अथवा असा सदस्य त्याचा पदावधी संपण्यापूर्वी किंवा अन्यथा कामकाज करण्यास अक्षम ठरल्यामुळे पद रिक्त झाले असेल तर, संस्थेची समिती, असे पद रिक्त झाल्याबद्दल, तात्काळ राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास व जिल्हा सहकारी निवडणूक अधिकाऱ्यास कळवील आणि असे कळविल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या

आत असे रिक्त पद ज्या सदस्यांच्या प्रवर्गामधून रिक्त झाले असेल त्याच प्रवर्गातील उर्वरित पात्र सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखालील समितीच्या उर्वरित सदस्यांच्या बैठकीत भरण्यात येईल :

परंतु, समितीच्या पदावधीमध्ये कोणत्याही परिस्थितीत, समितीच्या एकूण सदस्य संख्येच्या एक तृतीयांश पेक्षा अधिक सदस्य नामनिर्देशित केले जाणार नाहीत.

(२) पोट-नियम (१) अन्वये अशाप्रकारे निवडून आलेला किंवा नामनिर्देशित केलेला सदस्य, जर पद रिक्त झाले नसते तर, समितीचा सदस्य म्हणून ज्या सदस्याच्या जागी तो निवडून आला असेल त्या सदस्याने ज्या कालावधीपर्यंत पद धारण केले असते केवळ तेवढ्याच पदावधीपर्यंत पद धारण करील."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अनूप कुमार,**
शासनाचे प्रधान सचिव.

## CO-OPERATION, MARKETING AND TEXTILES DEPARTMENT

Mantralaya(Annex), Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,

Mumbai 400 032, dated the 17th February 2022

*NOTIFICATION*

MAHARASHTRA CO-OPERATIVE SOCIETIES ACT,1960.

No. CSL-2016/C.R. 35/13-C.—In exercise of the powers conferred by sub-section (*1*) and (2) of section 165 of the Maharashtra Co-operative Societies Act, 1960 (Mah.XXIV of 1961), and of all other powers enabling it that behalf, the Government of Maharashtra hereby, after considering objections and suggestions, pursuant to the Government Notification, Co-operation, Marketing and Textiles Department, No. CSL-2016/C.R. 35/13-C, dated the 16th December 2021, published in the *Maharashtra Government Gazette*, Extraordinary, Part IV-B, dated 16th December, 2021, makes the following rules further to amend to the Maharashtra Co-operative Societies (Election to Committee) Rules, 2014, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Co-operative Societies (Election to Committee) ( Third Amendment) Rules, 2021.

2. For rule 74 of the Maharashtra Co-operative Societies (Election to Committee) Rules, 2014, the following rule shall be substituted, namely :—

" 74. Casual vacancies.—(1) In the event of the vacancy occurring on account of death, resignation, disqualification or removal of an elected committee member of a society or through such a member becoming incapable of acting, prior to the expiry of his term of office or otherwise, the committee of the society shall forthwith communicate the occurrence of such vacancy to the State Co-operation Election Authority and District Co-operation Election Officer, and the vacancy shall be filled within one month from the date of such communication, by nomination of the eligible members out of the same class of the members in respect of which casual vacancy/vacancies has arisen, in the meeting of the remaining members of the committee, which shall be presided over by an officer authorized by State Co-operation Election Authority :

Provided that, at any instance during the tenure of a committee, there shall not be nominated members of the committee exceeding one third of the total strength of the committee.

(2) The member so elected or nominated under sub-rule (1) shall hold office so long only as the member of the committee in whose place he is elected would have held it, if the vacancy had not occurred."

By order and in the name of the Governor of Maharashtra,

ANOOP KUMAR,
Principal Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.